जा.क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१६/7245
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१
दिनांक:-09/११/२०१६

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक,(सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.(सर्व)
३. शिक्षण निरीक्षक, मुंबई (उ/द/प)

विषय :- संगणक टायपिंग अभ्यासक्रम राबविणाऱ्या शासनमान्य वाणिज्य संस्थांच्या मान्यतेचे ऑनलाईन नुतनीकरण आणि वाढीव सेटअपला मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. एसपीई-१०१२/(१०८/१२)/साशि-१,दि. ३१ ऑक्टोंबर २०१३.
२) महाराष्ट्र वाणिज्य विभाग शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन, पदविका आणि संगणक टायपिंग अभ्यासक्रम) मान्यता आणि संचालन नियम १९९१ सुधारीत नियमावली २०१४.
३) या कार्यालयाचे जा.क्र. मरापप/ जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१६/६७६३,दि. २०/१०/२०१६.

उपरोक्त विषयी संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रातील परिच्छेद ७ मध्ये " यापूर्वी विभागांनी संस्थाच्या संगणक टायपिंग मान्यतेच्या नुतनीकरणाची ऑफलाईन (कागदोपत्री) प्रक्रिया केली असल्यास पुन:श्च ही प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने परिषदेने उपलब्ध करुन दिलेल्या तपासणी अहवालानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांनी करावी " असे नमूद आहे.

सदर परिपत्रकाच्या दिनांकापर्यंत ज्या संस्थाना विभागीय शिक्षण उपसंचालकांनी ऑफलाईन प्रक्रिया करुन नुतनीकरणास मान्यता दिली असेल, अशा संस्थांच्या बाबतीत क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी उपलब्ध संचिकेच्या आधारे नुतनीकरणाबाबत परिषदेने उपलब्ध करुन दिलेल्या नमुन्यात माहिती भरावी व अपलोड करावी . यासाठी क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पुन:श्च संस्थेस भेट देण्याची आवश्यकता नाही.

तथापी मान्यता व संचालन नियम १९९१ सुधारीत नियमावली २०१४ प्रकरण २ मधील मुद्दा क्र. ७.४ अन्वये संगणक टंकलेखन संस्थेचे कामकाज समाधानकारक असल्यास मान्यता संपण्याच्या तीन महिने अगोदर सरकारी मान्यतेच्या आदेशाचे पुढील तीन वर्षासाठी नंतर पाच वर्षासाठी आणि त्यानंतर दहा वर्षासाठी नुतनीकरण वेळोवेळी करता यावे यासाठी , दि. १० नोव्हेंबर २०१६ नंतरही पुढे परीक्षा परिषदेच्या mscepune.com या संकेतस्थळावर नुतनीकरणीची लिंक (Link) चालू राहील.

( सुखदेव डेरे )
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०१.